"Women agricultural labour"
Sumati Sawant

# शेतमजूर स्त्री



भारताची लोकसंख्या १९७१ मध्ये जवळपास ५५ कोटींच्या आसपास होती. त्यात २६ कोटी स्त्रिया होत्या. कामकरी म्हणून नोंदलेल्या स्त्रियांची संख्या फक्त तीन कोटी! बाकीच्या स्त्रिया स्वत:च्या घरी घरकामाचे गाडे उपसत असतात.

१९६१ पासून कामकरी स्त्रियांच्या संख्येत बरीच घट झाली आहे. पण स्त्रियांच्या बेकारीची नोंद फारशी होत नसल्याने त्या प्रश्नाचे गंभीर स्वरूप लक्षात येत नाही.

कामकरी स्त्रियांतील जवळ जवळ एक कोटी स्त्रिया आपल्या नवऱ्याच्या किंवा वडिलांच्या शेतावर मदत करणाऱ्या आहेत आणि दीड कोटीहून अधिक स्त्रिया शेतमजूर म्हणून काम करतात. बिगर शेती व्यवसायात काम करणाऱ्यांपैकी ६० टक्के स्त्रिया घरगुती उद्योग व सेवाचाकरी–विणकाम, बुरूडकाम, दोर वळणे, घरकाम, झाडूकाम–अशा व्यवसायात, तर दहा टक्के फेरीवाल्या, भाजी विकणाऱ्या इत्यादी बिनकसबी आणि कमी मिळकतीच्या व्यवसायामध्ये आहेत.

एकूण काय? बहुसंख्य स्त्रियांना रोजगार मिळत नाही आणि रोजगार मिळला तरी काम अनिश्चित, अपुरे, कमी वेतन असलेले असेच. मिळवत्या स्त्रियांतील निम्म्या स्त्रिया खेडोपाडी शेतमजुरीचे काम करतात.

शेतमजूर स्त्रीची व्यथा समजून घेण्यासाठी अशाच आम्ही काहीजणी जमलो होतो. शेतमजूर स्त्री[...] कहाणीपासून सुरवात केली शांतानी!

"आरे ये पोरीहो ऽऽअरे आटपलं नाही कां रे बाराचा टैम झाला तरी अजून घराच्या बाहेर निघा[...] नाहीत, आन् दिवस मावळतो न मावळतो त्योच [...] झाला सोडून द्या म्हणतात." महारवाड्याच्या कोपऱ्या वर येऊन आबाजी पाटलानं आरोळी मारली.

दगडीनं नेमकं पेला भरून उसनं कुदळाचं पी[...] आणलं होतं. त्याच्या दोन भाकरीही टाकल्या होत्या एक भाकर तव्यावरच होती. दगडी पाटला[...] आवाजानं घाबरली. घाई करून ती खुरपं आणण्या साठी घरात गेली. बाहेर आली तर तव्यावरच्या भाकरीची राख झाली होती. पहिल्या भाकरीचे दो[...] तुकडे करून दोन पोरांच्या हातात दिले. जळलेली भाकर फडक्यात गुंडाळून ती शेताकडे निघाली.

दोन दंड आणि सात ठिगळं असलेलं लुगडं गुडघ्या पर्यंत खेचून ती चालली होती. डोक्याच्या केसांची जाळवण केलं होतं. वहाणा घातल्या तर पाटलाच्या वाड्याचा अपमान होतो. उरात खुरपं अडक[...] पाटलाच्या धाकाने दगडी पळू लागली. शेतात जा[...] पर्यंत तिने बायकांना गाठले. अन् पाथ धरली."

शांता सांगत होती, "आबाजीच्या खालच्या वावरा[...] दगडीच्या दाल्ल्याच्या पायाला नांगराचा फाळ लागला. तो घरी रायला. उन्हाळ्याचं दिस. दगडीची मजुरी कितिक! मजुरी पुरं ना, खायला मिळना. दाल्ल्याच पाय तर वर वर सडत चालला आन् सरत्या मिरग[...] सोडून...

निंदता निंदता तिसरा प्रहर झाला. पाऊस सु[...] झाला. दिवस बुडोस्तवर पाऊस उघडला नाही. बा[...] घराकडं पळू लागल्या. घरी जातेवेळी दगडी आबाजीच्या वाड्यासमोर थांबली.

"आबाजी, अर्धी मजूरी द्या."

असं म्हणताच आबाजी खेचकला, "कोण ग तू लय माजलीस का? मायीत नायी तुला? यदुलच्या पहारा मी घरातली लक्ष्मी देत नाही."

घरी पोरं चिपाड होऊन पडली होती.

"दस्स! वास ग शांता!" अरुणा उसळ[...] ओरडली. 'दिवसभर मरमर मरायचं आणि वर मजु[...]

[illegible]यची चोरी ! हे ऐतखाऊ मात्र नुसते बसून [illegible]तात...."

ऐकतर पुढे ' शांता शांतपणे हकीगत सांगू लागली. 'ओलींचिब झोपडी...पोटात अन्नाचा घास नाही. पोरं गमगार झालेली. रडत विव्हळत दगडीने रात्र काढली आणि उजाडल्यावर दीनवाणी पुन्हा पाटलाची विनवणी करायला गेली. पाटलाचा पारा चांगलाच चढला. दगडी त्याच्या पाया पडायला कलंडली आणि तिच्या पोटात लाथ बसली.'★

"कां ? कां पण हा अत्याचार सहन करायचा ?" अरुणला सहन करणे अशक्य झाले, 'पहाटेपासून कामाच्या रगाड्याला जुंपायचे–दूरवरच्या विहिरीवरून पाणी भर, काटक्या गोळा करून चूल पेटव, असेल पीठ तर दोन भाकरी बडव नाहीतर वणवण हिंडून थोडं वसनं आण. पोरांना उपाशी टाकून तंगड्या तोडीत मळ्यावर राबायला जा. मालकाच्या नी त्याच्या पोरांची मजुरी तर विचारायलाच नको. ऐतखाऊ सगळे ! जमिनीचा माज आहे ना...हा... टाकायला कमी करणार नाहीत. रुपाया दीड रुपाया मजुरी टेकवली ते नशिबच. दगडीने मरमर मरायचं आणि मालकांनी उपकार केल्याच्या थाटात दान केल्यासारखी मजुरी द्यायची. या अन्यायाला काही सीमा आहे की नाही ? एक-दोन शंभर– हजार अशा किती दगडी गुलामासारख्या जगतात !"

"भारतापुरतं बोलायचं झालं तर सुमारे १,५८,००,००० दगडी शेतमजूर म्हणून राबताहेत." शांता सांगू लागली, "दिवसभर राबून मुलांना पोटभर जेवू घालता येत नाही. अंगावर धड कपडा नाही, शाळेची तर बातच नाही. वर्षाकाठी ४-५ महिने शेतीचं काम. शेतकाम नसलं की 'जगायला' बिऱ्हाड बाजलं घेऊन लागायचं देशोधडीला. कामाचा मोसम असला की उसंत नाही. हक्काची सुट्टी किंवा रजा थोडीच नोकरीवाल्यांप्रमाणे मिळते. जेवढे दिवस काम तेवढा दाम. जरा उशीर झाला की लागलीच कात्री. आजारपण, अडचण असली तर उपासमारच. शेतात काम असेल तेव्हा मालक बोलावणार, एरवीची जिम्मेदारी कोणावरच नाही. अशा वेळी डहाणूतले आदिवासी 'जगण्यासाठी' वीटभट्टी, मिठागर किंवा इतर बिगारी कामाच्या शोधात बाहेर पडतात. पाथर्डीतली शेतमजूर कुटुंबं साखर कारखान्याजवळ पाचटाच्या पालांमध्ये वसती करून ऊस तोडण्या–बांधण्याच्या कामाला जुंपून घेतात. पाचटांनी हात रक्ताळतात पण हात थांबला तर पोटाला काय मिळणार ? शहाद्यातली भिल्ल कुटुंबे डोंगर कपारीतून मोळ्या जमवून दहावीस मैल दूरच्या गावातून ते भारे विकण्यासाठी उन्हातान्हातून डोक्यावरून वाहून नेतात. हिमालयापासून केरळपर्यंत सहा लाख खेड्यांमधून ह्या १५८ लाख शेतमजूर स्त्रिया पांगलेल्या आहेत. पुरुषांएवढं काम करूनही मजुरी मात्र त्यांच्या दोन तृतीयांश एवढीच. एवढे कष्ट उपसून हातातोंडाची गाठ नाही. मग खावटीसाठी कर्ज. अशा दरिद्री, अडाणी, पिचलेल्या पिळलेल्या कातावलेल्या तरीही धडपडणाऱ्या या शेतमजूर स्त्रिया."

"पण अशा ह्या दीनवाण्या, एकट्याएकट्याचा धडपडीचा फायदा काय ? दगडीची आई पण कष्ट उपसत झिजून मेली आणि दगडीची मुलगीही अशीच मरणार ? स्वतंत्र भारताच्या नागरिक म्हणून त्यांना काहीच स्थान नाही ? त्यांना कोणतेच हक्क नाहीत ?" अरुणा चिडून बोलत होती.

"भारतीय राज्यघटना आणि राज्याराज्यातील कायदे यांनी तसे हक्क त्यांना बरेच दिले आहेत. आता महाराष्ट्रात किमान वेतन कायदा आहे, समान वेतनाचाही हक्क आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की शेतमजूर पुरुष-स्त्रिया खेड्या खेड्यातून विखुरले आहेत. एका खेड्यात सुद्धा जातीपातीत विभागले आहेत. मराठे महारांबरोबर जाणार नाहीत. महार–मांगांची भांडणं आहेत. त्यामुळे कायदे राहातात कागदोपत्री आणि जमीन–मालकाचे गुलामीत राहातात शेतमजूर. शिक्षण नाही नि कसब नाही. खेडे सोडून तरी जाणार कुठे ? शहरातून तरी कोठे काम मिळते ? कायदे करून ते काय मालक खुशीने पाळणार थोडेच ? त्याच्याकरता समाजाचा दबाव हवा. शेतमजूर – शेतकरी संघटना हवी. बायका त्यात एकदम सामील तरी होणार कशा ? त्यांना उसंत पण नसते. आणि काय करायचे ते सुधरत पण नाही. पण हे काम चिकाटीने केले तर बरेच काही साधता मात्र निश्चित येईल.

आज जिथे साखर कारखाने आहेत आणि सरकारी मोठी शेती आहे, मोठे मळे आहेत तेथे शेतमजूर

★ 'दगडी' बी. ओ. बोर्डे, मिलिंद महाविद्यालय (औरंगाबाद) रौप्यमहोत्सव अंकातील कथेवरुन.

ना कामाला लागलेल्या दिसतात. किमान मजुरीचा द्दा पाळावा, कामाचे तास नेमून द्यावे यांसाठी मोर्चे होताहेत. १९७२ च्या दुष्काळात पण ांनी पुष्कळ लढे दिले. दुष्काळी काम सुरू झाले जे, मोजणी बरोबर झाली पाहिजे, वेतन बरोबर ाले पाहिजे, गैरव्यवहार थांबले पाहिजेत, शेतीला ोगी अशी कामे निघाली पाहिजेत म्हणून बायका ारीने लढल्या. एवढी धडपड करून कामे काढायला ली नी दुष्काळाच्या खायीत कसातरी तग धरला. ठिकाणी रोजगार हमी योजना राबली पाहिजे, ान वेतन मिळाले पाहिजे, स्वस्त धान्य मिळाले हजे यासाठी बायका-पुरुष शेतमजूर संघटनांतून पडताहेत.

आज तुरळक सुरवात झाली आहे. बायका ोबाहेर पडायला पाहताहेत. पण अशा संघटना र हजारोनी उभ्या राहिल्या पाहिजेत. अशा टनांमधून बायकांची भीड चेपेल. अन्याय-याचाराला वाचा फोडायला थोडी वाट मिळेल, हीसा आत्मविश्वास निर्माण होईल. मग त्याला क्षणाची जोड हवी. लिहायला वाचायला यायला वं, आजूबाजूच्या जगाची माहिती व्हायला हवी. प लोक गरीब आणि काही श्रीमंत का याची कारणे ळायला हवी. एकाने हुकूम सोडयचा नी साऱ्यांनी काटपणे का ऐकायचे ? देवाने केले म्हणून ? गेल्या न्माचे पाप म्हणून ? देव म्हणजे काय ? जग आणि ीव निर्माण कसे झाले ? पाप म्हणजे काय ? आपण ष्टाचा मोबदला मागणे पाप असते का ? का मालकाने ापल्या पोटात लाथ मारणे पाप ? ह्याची शिक्षा कोण णार ? हळूहळू सामाजिक प्रश्न आणि उत्तरे यांचेही क्षण सुरू होते.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे स्त्रियांनी निरनिराळ्या अडचणी एकमेकीला मदत करून सोडवण्याचा यत्न करायला शिकायचे. मुलांना सांभळण्याचे काम, बाजारातून एकदम माल आणला तर वेळ नी पैसे पण वाचतात त्यासाठी ग्राहक सहकारी सोसायटी सुरू करायची. कोणाच्या घरी मारहाण, दारूबाजी झाली तर तिची कैफियत, भांडणतंटे सोडवायला मदत करायची. दगडीने आपल्या घरात रडत बसून कोणताच प्रश्न सुटणार नाही. पण दहा जणींनी एकमेकीला मदत केली तर बळ येईल आणि जबाबदारी घेण्याची ताकद पण वाढेल.

वेळेवारी मजुरी मिळाली पाहिजे. किमान वेतन मिळाले पाहिजे. गावात पोटभर स्वस्त धान्य, डाळी तेल, गूळ यांचा पुरवठा झाला पाहिजे, सरकारने रोजगार हमी घेतली पाहिजे. अशा कामासाठी व पोटभर अन्न मिळण्यासाठी निरनिराळ्या मागण्या घेऊन पुढे आले, सर्व स्त्री-पुरुष शेतमजुरांनी बरोबर झगडा दिला तर पदरी काही पडेल. जातीपातीवरुन, भांडणतंट्यावरून फाटाफूट होऊन दिली तर मात्र पुढे पाऊल पडणार नाही.

शिक्षण-कसब वाढवायला हवे. नवे धंदे-व्यवसाय शिकायला हवे आणि ग्रामीण पातळीवर लहान उद्योग, शेतीला पूरक व्यावसाय मिळण्यासाठी सरकारकडे मागणी करायला हवी. हे धंदे चालविण्याची जबाबदारी घेण्यासाठी कुवत वाढवली पाहिजे. केवळ ढोरांसारखं जन्मभर राबत नाही राहणार – – पुढे जाणार, पुढे जाणार ही धडपड हवी.

परस्पर – सहकार, शिक्षण, झगडे ह्याच्यातून असहायता, अडाणीपणा, देवभोळेपणा, न्यूनगंड हटत जाईल. आत्मविश्वास, जबाबदारी घेण्याची कुवत आणि कसब वाढेल." शांता धिमेपणाने सांगत होती.

"पण मुख्य प्रश्नाचे काय ? शेतमजूर स्त्रियांच्या परिस्थितीत वास्तविक बदल करायचा असेल तर जमिनीच्या फेरवाटपाशिवाय दुसरा मार्ग नाही असे भारतसरकारने स्त्रियांच्या स्थानाचा अभ्यास करायला नेमलेली समितीसुद्धा म्हणते. जमीन मिळाल्याशिवाय पाटलाची मग्रुरी कमी कशी होणार ? जमीन आहे तर मान आहे, प्रतिष्ठा आहे, सत्ता आहे. त्याच्या समोर ब्र कोण काढणार ? त्याने अन्याय केला तर साक्ष कोण देणार ? जमिनीची सत्ता मोडली पाहिजे. जमिनीच्या फेरवाटपाला पर्याय नाही. शेतमजूरांचा प्रश्न धसाला लावावयचा तर जमीन........."

अरुणा तावातावाने मांडत होती.

'इथे बसून ओरडायला काय जातं ? पण खेडोपाडी किती अंधार आहे, किती दुबळेपणा आहे, किती अडाणीपणा आणि दुफळी आहे याचा विचार केला म्हणजे लक्षात येईल की पाया घालायला खूप परिश्रम करायला हवे. ज्याला जी मदत करता येईल ती त्याने करायला हवी. ह्या सर्वांच्या जोरावर जमिनीची मागणी करता येईल. अहवालात मांडलेली मागणी हे स्वप्न आहे ते खरे करायला....'

शांता शांतपणे सांगत राहिली. —सुमती सावंत